मराठी दैनिक

Email : parshuramsamachar@gmail.com

RNI No MAHMAR/2010/37490

# परशुराम समाचार

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड मध्ये वितरित

Postal No. PLG/243/2022-2024

वर्ष १३ || अंक ३२५ || ठाणे, बुधवार २४ एप्रिल २०२४ || किंमत : ३ रूपये || पाने : ४

## शालेय शिक्षण विभागाच्या खात्यातून ४७ लाख ६० हजार चोरीला



**मुंबई प्रतिनिधी (नितीन बोंबाडे):** शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या खात्यातून तब्बल ४७ लाख ६० हजार चोरीला गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरोपींनी शालेय शिक्षण विभागाचे बनावट स्टॅम्प, बनावट चेक आणि स्वाक्षरीद्वारे चार टप्प्यात ४७ लाख ६० हजार काढल्याची माहिती समोर आली आहे शालेय शिक्षण विभागाचे बनावट स्टॅम्प, बनावट चेक आणि स्वाक्षरीद्वारे चार टप्प्यात ४७ लाख ६० हजार काढल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी मरीनड्राइव्ह पोलिस ठाण्यात चौघांवर कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४७३, ३४ भादवी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या खात्यातून काढण्यात आलेले पैसे हे नमिता बग, प्रमोद सिंग, तप कुमार, झितन खातून यांच्या खात्यावर ही रक्कम जमा झाल्याचे तपासात समोर आले आहे. हे चौघे कोण आहेत? यामागे नेमका कुणाचा हात आहे? याबाबत पोलिस अधिक चौकशी करत आहे शालेय शिक्षण विभागाच्या मंत्रालय येथील बँकेत असलेल्या खात्यातून हा गैरप्रकार घडला आहे. मात्र अशा प्रकारे शासनाच्या खात्यातून पैसे चोरीला जाण्याचीही काही पहिली वेळ नाही. पान क्र. २ वर...

# जूनपर्यंत बदलणार कोस्टल रोडचा चेहरामोहरा; नवे बदल तुम्हाला कितपत फायद्याचे?

**मुंबई प्रतिनिधी (जयेश रामाडे) :** मुंबईच्या प्रवासमार्गांमध्ये मागील काही वर्षांत सातत्यानं झालेल्या बदलांमुळं शहरातील वाहतुकीला आधुनिकीकरणाची जोड मिळाल्याचं स्पष्टपणे पाहायला मिळत आहे. अशक्य वाटणारे रस्तेही आता जोडण्यात आल्यामुळं शहराचा मुख्य भाग आणि उपनगरंही जवळ आली आहेत. यामध्ये सध्या महत्त्वाच्या भूमिकेत असणारा शहरातील एक रस्ता म्हणजे, कोस्टल रोड अर्थात सागरी किनारा मार्ग. लोकार्पण झाल्या दिवसापासून या मार्गावरून महिन्याभरात जवळपास सव्वादोन लाखांहून अधिक वाहनांनी प्रवास केला. वाहनांचा सरासरी आकडा घ्यायचा झाल्यास दर दिवशी या मार्गावरून १९५०० वाहनं प्रवास करतात. अशा या शहरातील मुख्य भागांना जोडणाऱ्या कोस्टल रोडवरून येत्या काळात एका दिवसात ९० हजार किंवा त्याहून अधिक वाहनंही धावू



शकतात अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता म्हणजेच कोस्टल रोडवर सध्या फक्त एकाच बाजुची वाहतूक सुरु असून वाहनांना मरिन ड्राईव्ह ते वरळी असा प्रवास करता येत आहे. पण, सी लिंक कडील दक्षिण टोकापर्यंचा प्रवास जूनपपर्यंत सुरु होणार असल्यांमुळं कोस्टल रोडचा नवा चेहरामोहरा शरातीस वाहतुक व्यवस्था पुन्हा बदलणार आहे. कोस्टल रोडचा पुढील टप्पा आणि त्यानंतर सर्व इंटरचेंज सुरु झाल्यानंतर इथून ये-जा करणाऱ्या वाहनांच्या आकड्यात लक्षणीय वाढ होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्याचं सूत्रांनी स्पष्ट केलं. सध्याच्या घडीला सकाळी १० वाजण्याच्या सुमारास या मार्गानं प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या सर्वाधिक असते.

पान क्र. २ वर...

## अभिनेता रणवीर सिंहची 'त्या' व्हिडीओ विरोधात एफआयआर दाखल



**मुंबई (प्रतिनिधी):** अभिनेता आमिर खान पाठोपाठ आता रणवीर सिंहने देखील पोलिसांत धाव घेतली आहे. रणवीर सिंहचा एक डीपफेक व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर आता त्याने कायदेशीर पावले उचलत सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत एफआयआर नोंदवला आहे. आतापर्यंत अनेक फिल्म स्टार डीपफेक व्हिडिओचे बळी ठरले आहेत. अभिनेत्री रश्मिका मंदान्ना, अभिनेता आमिर खाननंतर आता रणवीर सिंगचा डीपफेक व्हिडिओ सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. देशभरात निवडणुकीची धामधूम सुरू असताना रणवीर सिंहचा राजकीय भाष्य करणारा व्हिडीओ व्हायरल होत आहे. यामध्ये रणवीर एका राजकीय पक्षाचा प्रचार करताना दिसत असल्याचे दिसून आले. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यामूत तयार करण्यात आलेल्या या डीपफेक व्हिडीओविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पान क्र. ३ वर...

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदासाठी तुमचं ग्रुमिंग करणार होते; आदित्य ठाकरे म्हणाले...

**मुंबई प्रतिनिधी (शैलेश पालकर):** देवेंद्र फडणवीस यांनी आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदासाठी तयार करुन ते स्वतः दिल्लीत जाणार असल्याचे मला सांगितले होते, असे वक्तव्य अलीकडेच उद्धव ठाकरे यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर स्वतः आदित्य ठाकरे यांनी या विषयावर भाष्य केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी तुम्हाला मुख्यमंत्रीपदासाठी तयार करण्याचा प्रस्ताव मांडला होता, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. यावर तुम्हाला काय वाटते, असा प्रश्न आदित्य ठाकरे यांना एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीमध्ये विचारण्यात आला होता. त्यावर आदित्य ठाकरे यांनी फार स्पष्टपणे बोलण्याचे टाळत भाजपने




शिवसेनेशी कशाप्रकारे राजकीय करार केला होता, हे सांगण्यावर अधिक भर दिला. आदित्य ठाकरे यांनी म्हटले की, मुख्यमंत्रीपदासाठी माझं ग्रुमिंग करण्याच्या विषयावर उद्धव ठाकरे बोलले आहेत. मुद्दा हा आहे की, २०१९ मध्ये भाजप आणि शिवसेनेत राजकीय करार झाला होता. मात्र, भाजपने त्या कराराचा सन्मान केला नाही. २०१४ मध्येही भाजपने ऑक्टोबर महिन्यात शिवसनेसोबतची युती तोडली. कारण अंतर्गत सर्वेक्षणात त्यांना स्वबळावर विजय मिळेल, असा अहवाल आला होता. पान क्र. २ वर...

## वसईकरांसाठी मोठी बातमी; किल्ल्यात तळ ठोकून बसलेला बिबट्या अखेर जेरबंद

**वसई प्रतिनिधी (विठ्ठल जोशी) :** वसई किल्ल्यात शिरलेल्या बिबट्याला जेरबंद करण्यास अखेर वनविभागाला यश आले आहे. अखेर २५



दिवसांनंतर वनविभागाच्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला आहे. त्यामुळं भीतीच्या छायेत वावरणाऱ्या वसईकरांनी व ग्रामस्थांनी अखेर सुटकेचा श्वास घेतला आहे. २५ दिवसांपूर्वी वसई किल्ल्या परिसरात बिबट्या दिसला होता. त्यामुळं परिसरात एकच भीतीचे वातावरण पसरले होते. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने ठिकठिकाणी सीसीटीव्ही व ट्रॅप बसवले होते. मात्र, तरीही बिबट्याला पकडण्यात यश येत नव्हते. त्यामुळं नागरिकही हैराण झाले होते. रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर पडू नये असं अवाहनदेखील करण्यात आलं होतं. पान क्र. २ वर...

## अभिषेक घोसाळकर गोळीबार प्रकरणात मुंबई पोलिसांवर पत्नीचा गंभीर आरोप, हायकोर्टाचे महत्त्वाचे निर्देश

**मुंबई प्रतिनिधी (मंगेश कड्डु):** शिवसेना नेते विनोद घोसाळकर यांचे पुत्र अभिषेक घोसाळकर यांची काही दिवसांपूर्वी गोळ्या झाडून हत्या



करण्यात आली होती. याप्रकरणात आता घोसाळकर कुटुंबीयांनी मुंबई पोलिसांच्या तपासाबाबत गंभीर आरोप केले आहेत. मुंबई पोलीस या हत्याप्रकरणाच्या तपासात खूप घाई करत आहेत. पोलिसांनी घाईघाईतच न्यायालयात आरोपपत्र दाखल केल्याचे घोसाळकर कुटुंबीयांचे म्हणणे आहे. गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यासाठी ९० दिवसांची मुदत असते. मात्र, मुंबई पोलिसांनी केवळ ६० दिवसांतच तपास आटोपून आरोपपत्र दाखल केले. मूळ तक्रारदार असलेल्या अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी तेजस्विनी घोसाळकर यांचे म्हणणे मुंबई पोलिसांनी नीट ऐकून घेतले नाही, असेही घोसाळकर कुटुंबीयांकडून उच्च न्यायालयात सांगण्यात आले. घोसाळकर कुटुंबीयांच्या आरोपानंतर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवत सखोल तपासाचे निर्देश दिले. अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येचा सर्व बाजूंनी तपास करणे आवश्यक आहे. त्यासाठी घटनेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज आणि सीडीआर ताब्यात घेत सखोल चौकशी करावी, असे न्यायालयाकडून सांगण्यात आले.

पान क्र. २ वर...

## महायुती, मविआत 'या' जागांचा तिढा सुटेना, प्रचारासाठी वेळ मिळेल ना?

**मुंबई प्रतिनिधी (प्रमोद कदम ):** महायुतीत अजूनही ७ लोकसभा मतदारसंघांचा तिढा सुटलेला नाही, तर मविआत मुंबईतील दोन जागांचा वाद कायम आहे. या सर्व मतदारसंघांसाठी पाचव्या टप्प्यात म्हणजे २० मे रोजी मतदान होतंय.. तांत्रिकदृष्ट्या मतदारसंघांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करायला बराच वेळ आहे. त्यामुळे वाटाघाटींसाठी राजकीय पक्षांचं हायकमांड वेळ घेतंय. मात्र याचा उलट परिणाम असा होतोय की इच्छुक उमेदवारांचं टेन्शन वाढलंय. कारण उमेदवार ठरत नाही तोपर्यंत प्रचारात उमेदवाराचा चेहरा घेऊन प्रचार करता येत नाही. ना सभा घेता येतात ना प्रचार फेरी काढता येतात ना प्रचारपत्रकं छापता येतात.

पान क्र. २ वर...



## सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणी मुंबई पोलिसांना मिळाले मोठं यश



**मुंबई (प्रतिनिधी) :** बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेला मोठं यश मिळाले आहे. गुजरातमधील सूरत येथे तापी नदीत फेकलेली दुसरे पिस्तुलही पोलिसांनी हस्तगत केले आहे. पोलिसांकडून दोन दिवस तापी नदीत शोध मोहीम सुरू होती. मुंबई पोलिसांच्या तपास पथकाकडून सलग दोन दिवस शोधमोहिम सुरू होती. या दोन दिवसांच्या अथक शोधमोहिमेनंतर दोन पिस्टल आणि ३ मॅगझिन नदीत सापडल्या. सोमवारपासून गुन्हे शाखेचे पथक गुजरातच्या तापी नदीत शोधमोहीम करत होते. युनिट ९ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दया नायक यांच्या नेतृत्वात शोधमोहिम सुरू होती. मुंबईतील वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाहेर १० राऊंड गोळीबार करण्याचे आदेश हल्लेखोरांना देण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली. गोळीबार केल्यानंतर हल्लेखोरांनी आपले शस्त्र सूरतमधील तापी नदीत फेकले असल्याची माहिती दिली. पान क्र. ३ वर...

## 'आपल्याला अटक होईल अशी भीती फडणवीसांच्या मनात होती, आपण फार मोठा...'; राऊतांचा दावा

**मुंबई प्रतिनिधी (कैलास मोरे ) :** उद्धव ठाकरे गटाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अटकेची भीती होती असा दावा केला आहे. बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणामध्ये फडणवीस हे आरोपी होते. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील सरकारने या प्रकरणाचा तपास सुरु केला होता म्हणून फडणवीसांना अटकेची भीती वाटत होती, असा दावा राऊत यांनी केला आहे. सरकार कारण नसताना कोणाला अटक करत नाही. आरोपी कितीही मोठा असो कायद्यासमोर सर्व समान असतात हे असं कोणाचं म्हणणं आहे तर शिंदेंचे आताचे बॉस आहेत नरेंद्र मोदी, अमित शाहा यांचं म्हणणं आहे. म्हणून तर मोदींच्या सरकारने झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक केली. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली. अनेक मंत्र्यांना, आमदारांना आणि खासदारांना अटक केली. का अटक केली? त्यांच्याशी संलग्न काही ना काही आरोप जोडण्यात आले, असं राऊत म्हणाले. उद्धव ठाकरेंची सरकार फडणवीसांना अटक करत होती, आशिष शेलारांना अटक करत होती. का करत होती तर त्यांनी काही ना काही केलं असेल ना? काही कारण नसताना कोणी कोणाला अटक करतं का? असा सवाल राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला.

पान क्र. २ वर...



## छगन भुजबळांच्या दोषमुक्तीला विरोध मात्र अद्याप आव्हान दिलेलं नाही : राज्य सरकार

**मुंबई प्रतिनिधी (विकास पाटील) :** महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांच्यासह



अन्य आरोपींनी मुंबई सत्र न्यायालयात दोषमुक्तीसाठी केलेल्या अर्जाला आम्ही विरोध केला होता. मात्र, या दोषमुक्तीच्या निर्णयाला अद्याप आव्हान दिलेलं नाही, अशी कबुली राज्य सरकारनं सोमवारी हायकोर्टात दिली. मात्र या निर्णयाला मूळ तक्रारदारासह अन्य काहींनी आव्हान दिल्याचं कोर्टाला सांगण्यात आलं. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे नेते सुहास कांदे यांनी भुजबळांच्या दोषमुक्तीला आव्हान दिलेलं आहे. पान क्र. २ वर...

## मानखुर्दमध्ये सहा वर्षांच्या चिमुकल्याचा खड्ड्यात पडून मृत्यू



**मुंबई (प्रतिनिधी) :** मानखुर्द रेल्वे स्थानकाजवळ मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडून सहा वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू झाला आहे. पुतण्याच्या मृत्युचा धक्का सहन झाल्याने काकाने देखील आत्महत्या केली आहे. चेंबूर आणि गोवंडी दरम्यान त्यांनी आत्महत्या केली आहे. आयुष राजेश शेगोकार असे या सहा वर्षाच्या चिमुकल्याचे नाव आहे. मानखुर्द रेल्वे स्थानक जवळ मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडून आयुष राजेश शेगोकार या सहा वर्षाच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूचा धक्का सहन न झाल्याने आयुष ज्या चुलत्याकडे राहत होता, त्या शैलेश शेगोकारने ही लोकल ट्रेन खाली उडी घेऊन सोमवारी संध्याकाळी आत्महत्या केली आहे.चेंबूर आणि गोवंडीच्या रेल्वे ट्रॅकवर त्यांनी आत्महत्या केली आहे. मानखुर्द रेल्वे स्थानक जवळ मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडून पान क्र. ३ वर...

## आम्ही बापाच्या दोन नंबरच्या पैशावर उडत नाही, आमच्या नादी लागलात तर... भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याने सदा सरवणकरांच्या मुलाला सुनावलं

**मुंबई प्रतिनिधी (वैभव सिंग):** देशाचा विकास आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान



करण्यासाठी महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे तिन्ही पक्ष सध्या एकदिलाने वाटचाल करत असल्याचे प्रमुख नेत्यांकडून सांगितले जात आहे. मात्र, राज्यातील अनेक भागांमध्ये स्थानिक पातळीवर तिन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मनोमिलन तर सोडाच पण प्रचंड वितुष्ट असल्याच्या घटना अधूनमधून समोर येत असतात. याचाच प्रत्यय आता मुंबईत येताना दिसत आहे. दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात भाग असलेल्या माहीम विधानसभा मतदारसंघात शिंदे गट आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांमधील वाद उफाळून आला आहे. भाजपच्या माहीम विधानसभा क्षेत्राच्या अध्यक्ष अक्षता तेंडुलकर यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर यांचे सुपुत्र आणि माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्यावर घणाघाती भाषेत टीका केली आहे. समाधान सरवणकर हे मुंबई महानगरपालिकेतील शिंदे गटाचे माजी नगरसेवक आहेत. पान क्र. २ वर...

## मुंबईकरांना सावध करणारी बातमी; भाजी विक्रेती म्हणून घरोघरी फिरणारी महिला निघाली अट्टल गुन्हेगार

**मुंबई प्रतिनिधी (लक्ष्मण धुरंधरे) :** मुंबईकरांना सावध करणारी एक बातमी समोर येतेय. भाजी विक्रेता असल्याचा बनाव रचून घरफोडी करणाऱ्या एका महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. निलोफर खान वय ६० असं आरोपी महिलेचे नाव आहे. दिंडोशी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिला हा भाजीविक्रेती बनून बंद असलेल्या घरांची रेकी करायची आणि दिवसाढवळ्या घरफोडी करायची. संतोष नगर आणि अप्पर गोविंद नगर परिसरात अलीकडेच घरफोडी करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणी दिंडोशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. २६ मार्च ते ८ एप्रिल दरम्यान या घटना घडल्या होती. त्यानंतर घरफोडी प्रकरणी पोलिस ॲक्शन मोडवर आले होते. पान क्र. ३ वर...



## ५२९ कोटींच्या आलिशान घरात घेणार अनंत - राधिका सप्तपदी, जेम्स बाँड व ब्रिटनच्या राणीचं कनेक्शन

**मुंबई (प्रतिनिधी):** आशियातील सर्वात श्रीमंत आणि उद्योगजगतातील सर्वात मोठं नाव मुकेश धिरुभाई अंबानी आणि नीता अंबानी यांच्या घरी लग्नघाई आहे हे सर्वांचं माहिती आहे. या कुटुंबात जो काही सोहळ्या असतो अद्वितीय आणि भव्य असतो. शिवाय तो संस्कृतीशी जोडलेला असतो. मुकेश आणि नीता अंबानी यांचा धाकटा मुलगा अनंत अंबानी यांचं लग्न राधिका मर्चंट हिच्याशी होणार आहे. जामनगरमध्ये तीन दिवस प्री वेडिंग सेलिब्रेशन केल्यानंतर अनंत आणि राधिका यांचं लग्न कुठे होणार यांची सर्वांना उत्सुकता होती. अंबानी कुटुंबांचे सर्व सोहळे हे भव्यदिव्य असतात. या कुटुंबातील सोहळ्यात उद्योग जगतातीलच नाही तर विदेशातील सेलिब्रिटी, गायक, खेळाडूसह बॉलिवूडमधील प्रत्येक व्यक्ती उपस्थित असतो. एवढंच नाही तर राजकारणातील नेते मंडळीही आवर्जून या सोहळ्याला उपस्थित राहतात. जुलै महिन्यात अनंत राधिका हे कुठे सप्तपदी घेणार आहे या



स्थळाबद्दल माहिती समोर आली आहे. मुंबई ते जामनगर आणि आता दुबई ते अमेरिका असा हा लग्न सोहळा असणार आहे. जेम्स बाँडशी खास कनेक्शन असलेल्या लंडनमधील स्टोक्स पार्क इस्टेटमध्ये जुलै महिन्यात विवाह सोहळा होणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार २०२१ मध्ये मुकेश अंबानी यांनी ही मालमत्ता अनंतसाठी खरेदी केली आहे. ३०० एकरवर पसरलेले हे ५२९ कोटींच्या आलिशान घर १०६६ मध्ये बांधलं गेलंय. त्यानंतर १७६० मध्ये या आलिशान घराचा विस्तार झाला. या घरात ४९ आलिशान खोल्या तलाव, उद्यान, स्मारके, स्पा, क्लब हाऊस, रेस्टॉरंट, जिम फिटनेस सेंटर, टेनिस कोर्ट, गोल्फ कोर्स इत्यादी गोष्टी आहेत. ब्रिटनमधील सर्वात महागड्या मालमत्तापैकी ती एक आहे. स्टोक पार्क इस्टेट हे ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ घ् चं घर होतं. १९०८ नंतर ते कंट्री क्लबमध्ये रूपांतरित करण्यात आलं.

पान क्र. ३ वर...

## संपादकीय

# मुंबई इंडियन्सच्या प्ले ऑफच्या चाहत्यांना मोठा धक्का

मुंबईचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबीला बाद करत चहलने आयपीएलमधील २०० वी विकेट घेतली. चहल आयपीएलमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला आहे. विशेष म्हणजे चहलने मुंबई इंडियन्सच्या संघातूनच आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. आयपीएलमध्ये चहलने इतिहास घडवताच गुडघ्यावर बसून स्टाईलमध्ये सेलिब्रेशन केले. चहल २०२२ रोजी राजस्थानच्या संघात दाखल झाला होता. चहलने १५३ सामन्यात २०० विकेट्स घेतल्या. यामध्ये त्याने सहावेळा चार विकेट्स, तर एकवेळा ५ विकेट्स पटकावण्याची कामगिरी केली. मुंबई इंडियन्सचा पराभव करून राजस्थान रॉयल्सने पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थान मजबूत केले आहे. आता राजस्थान रॉयल्सचे ८ सामन्यांत १४ गुण झाले आहेत. त्याच वेळी, दुसऱ्या स्थानावर असलेल्या कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्समध्ये ४ गुणांचे अंतर आहे. मात्र, राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या पराभवानंतर मुंबई इंडियन्सच्या प्ले ऑफमध्ये पोहोचण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. आता मुंबई इंडियन्सचे ८ सामन्यांत ६ गुण झाले आहेत. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स पॉइंट टेबलमध्ये सातव्या स्थानावर आहे.राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात झालेल्या सामन्यान राजस्थानने ९ गड्यांनी विजय मिळवला. मुंबईला राजस्थानने संदीप शर्माच्या भेदकतेच्या जोरावर २० षटकांत ९ बाद १७९ धावांवर रोखले. हे लक्ष्य राजस्थानने १८.४ षटकांत १ बाद १८३ धावा करून पार केले. यशस्वी-जॉस बटलर यांनी ४८ चेंडूंत ७४ धावांची सलामी दिल्यानंतर यशस्वीने कर्णधार संजू सॅमसनसोबत ६५ चेंडूंत नाबाद १०९ धावांची भागीदारी करत संघाचा विजय स्पष्ट केला. राजस्थानने काल झालेला मुंबई इंडियन्सविरुद्धचा हा सामना घरच्या मैदानावर खेळला. यावेळी मैदानात उपस्थित राहिलेल्या सर्व प्रेक्षकांचे राजस्थानच्या संघाने आभार मानले. सामना जिंकल्यानंतर राजस्थानचे सर्व खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ यांनी सवाइ मानसिंग संपूर्ण मैदानावर फेरफटका मारला. यावेळी 'घणो घणो आभार...', असंही बॅनरवर लिहिण्यात आले होते.

**- दिलीप सिध्देशवर सिंग**

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदासाठी तुमचं ग्रुमिंग करणार होते; आदित्य ठाकरे म्हणाले...

**पान क्र. १ वरुन...**

त्यांना २५ वर्षांपासून असलेली युती तेव्हाच तोडायची होती. यावरुन भाजपचे 'वापरा आणि फेका' हे धोरण दिसून येते, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. मुख्यमंत्रीपदाबाबत बोलायचं झालं तर आमच्यासाठी शिवसैनिक मुख्यमंत्री होणे जास्त महत्त्वाचे आहे. एकनाथ शिंदेंनी गुजरातला जे पलायन केले, ते फक्त तुरुंगात जाण्यापासून वाचण्यासाठी होते. भाजपच्या 'जॉईन ऑर जेल' या धोरणामुळेच एकनाथ शिंदेंनी आमची साथ सोडली. त्यांच्या गटातील प्रत्येक आमदार तुरुंगवारी टाळण्यासाठीच भाजपसोबत गेला आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. राज्यात मविआ सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर आम्ही सध्या काळात देण्यात आलेल्या पालिकेच्या सर्व कंत्राटांची चौकशी करु. आम्ही भ्रष्टाचाराचे जे-जे आरोप केलेत, त्याबाबत आमच्याकडे पुरावे आहेत. आम्ही कोणालाही सोडणार नाही, अगदी महापालिकेच्या आयुक्तांनाही नाही, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला.

## अभिषेक घोसाळकर गोळीबार प्रकरणात मुंबई पोलिसांवर पत्नीचा गंभीर आरोप, हायकोर्टाचे महत्त्वाचे निर्देश

**पान क्र. १ वरुन...**

याप्रकरणाची पुढील सुनावणी ६ मे रोजी होईल. अभिषेक घोसाळकर हे ८ फेब्रुवारी २०२४ रोजी मॉरिस नरोन्हा नावाच्या व्यक्तीने गोळया झाडून हत्या केली होती. मॉरिसभाईने अभिषेक घोसाळकर यांना त्याच्या दहिसर येथील कार्यालयात साडीवाटपाच्या कार्यक्रमासाठी बोलावले होते. या कार्यक्रमापूर्वी दोघांनी मिळून एक फेसबुक लाईव्ह केले होते. या फेसबुक लाईव्हमध्ये अभिषेक घोसाळकर यांनी मॉरिसशी असलेले सर्व जुने वाद संपुष्टात आल्याची घोषणा केली होती. यानंतर काहीवेळातच मॉरिसने एका पिस्तुलातून अभिषेक घोसाळकर यांच्यावर अगदी जवळून गोळया झाडल्या होत्या. त्यानंतर मॉरिसने स्वतःवरही गोळया झाडून आत्महत्या केली होती. अभिषेक घोसाळकर यांना त्यांच्या कार्यकर्त्यांनी नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले होते. परंतु, तोपर्यंत अभिषेक घोसाळकर यांचा मृत्यू झाला होता. अभिषेक घोसाळकर हे शिवसेनेचे माजी नगरसेवक होते. त्यामुळे या घटनेने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. ठाकरे गटाकडून याप्रकरणात अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते. मात्र, आतापर्यंत पोलिसांच्या तपासातून याप्रकरणात फार काही विशेष निष्पन्न झालेले नाही. आता उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर मुंबई पोलीस पुढील सुनावणीत न्यायालयात काय भूमिका मांडणार, हे पाहावे लागेल. त्यामुळे आता हे प्रकरण आगामी काळात कोणती नवी दिशा घेणार का, याकडे अनेकांच्या नजरा लागल्या आहेत.

## छगन भुजबळांच्या दोषमुक्तीला विरोध मात्र अद्याप आव्हान दिलेलं नाही : राज्य सरकार

**पान क्र. १ वरुन...**

एसीबीनं आव्हान न दिल्यानं आपण मुंबई सत्र न्यायालयाच्या सप्टेंबर २०२१ मधील निर्णयाला आव्हान दिल्याचे कांदे यांनी आपल्या याचिकेतून नमूद केलं आहे.

सार्वजनिक विभागाचे तत्कालिन सचिव आणि राज्याचे माजी माहिती आयुक्त दीपक देशपांडे यांना वगळता मुंबई सत्र न्यायालयातील विशेष कोर्टानं छगन भुजबळ, त्यांचा मुलगा पंकज, पुतण्या समीर आणि इतरांना महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणातून दोषमुक्त केलंय. त्यामुळे आपल्यालाही यातून दोषमुक्त करण्याची मागणी देशपांडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाकडे केली आहे. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या एकलपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. सरकारी वकिलांनी भुजबळ कुटुंबीय आणि इतर आरोपींनी केलेल्या दोषमुक्ती अर्जाला पोलिसांनी विरोध केला होता. मात्र, त्यांना दोषमुक्त करण्याच्या निर्णयाला आव्हान दिलेलं नसल्याचं न्यायालयाला सांगितलं. त्याचवेळी, देशपांडे यांनी दोषमुक्तीसाठी केलेल्या याचिकेलाही आपला विरोध असल्याचं सरकारी वकिलांनी स्पष्ट केलं. मात्र देशपांडेंवरील आरोपांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आणि आरोप सिद्ध करणारे पुरावे सादर करण्यासाठी सरकारी वकिलांनी हायकोर्टाकडे वेळ मागितला. त्यांची ही विनंती मान्य करत या प्रकरणाची सुनावणी २९ एप्रिलपर्यंत तहकूब करण्यात आलीय.

दरम्यान, सत्र न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या अंजली दमानिया यांच्या याचिकेची दखल घेत हायकोर्टानं भुजबळांसह अन्य आरोपी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही मागील सुनावणीच्यावेळी नोटीस बजावली होती. मुंबईतील अंधेरी येथील 'आरटीओ'च्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसनाची अनुमती देताना त्या बदल्यात संबंधित कंपनीकडून दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या इमारतीची पुनर्बांधणी, तसेच मुंबईत मलबार हिल येथे विश्रामगृह बांधून घेण्यासाठी राज्य सरकारने कंत्राट दिले. या कामाची कोणतीही निविदाप्रक्रिया राबवण्यात आली नाही.

कालांतराने संबंधित कंपनीने इतर विकासक कंपनीसोबत करारनामा करत विकासाचे हक्क विकले. राज्य सरकारच्या निकषांप्रमाणे कंत्राटदार आस्थापनाला २० टक्के नफा अपेक्षित असतांना पहिल्या विकासकाला ८० टक्के नफा मिळाला. यामध्ये आस्थापनाने १९० कोटी रुपयांचा नफा कमावला. त्यातील १३ कोटी ५० लाख रुपये आस्थापनाने भुजबळ कुटुंबियांना दिले, असा आरोप भ्रष्टाचारविरोधी पथकाने केला आहे.

## 'आपल्याला अटक होईल अशी भीती फडणवीसांच्या मनात होती, आपण फार मोठा...'; राऊतांचा दावा

**पान क्र. १ वरुन...**

बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणात फडणवीस गुन्हेगार होते. बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणाचा तपास सुरु होता. त्यांना भीती होती की त्यांना अटक केली जाईल. माझ्याकडे काही माहिती आहे, सूचना आहे असं काही नव्हतं पण त्यांच्या मनात भूती होती की त्यांनी खूप मोठा गुन्हा केला आहे.

मुख्यमंत्री, गृहमंत्री असताना विरोधीपक्षांच्या नेत्यांचे फोन मी ऐकले आहेत. त्यासाठी मी दोन अधिकारी नियुक्त केले होते, अशी भूती त्यांच्या मनात होती, असं राऊत म्हणाले. त्यांनी (फडणवीसांनी) नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांपैकी एक रश्मी शुक्ला आज डीजी आहेत. नंतर त्याच्यावर लावण्यात आलेल्या एफआयआर मागे घेतल्या. का घेण्यात आल्या मागे एफआयआर? तपास व्हायला हवा होता ना? फडणवीसांच्या मनात भीती होती की या प्रकरणात त्यांना अटक होऊ शकते. जगात कुठेही अशा प्रकरणांमध्ये अटक होते आणि त्या व्यक्तीला तुरुंगात जावं लागतं. हा भयंकर गुन्हा होता. गृहमंत्री असतानाही त्यांनी हा गुन्हा केला होता. फडणवीसांना कोणी हात लावू शकत नाही का? ते कायद्याहून मोठे आहेत का? असा सवाल राऊत यांनी विचारला. प्रवीण दरेकर त्यांच्याविरोधात मुबैं बँक घोटाळा प्रकरणात चौकशी सुरु होती. तिथे हजारो कोटींचा घोटाळा झाला आहे. सिंचन घोटाळ्याबरोबर इतर अनेक प्रकरणांमध्ये ५० लाख, १० लाखांसाठी भाजपावाल्यांनी लोकांना अटक केली ना? मग या लोकांना काय कायदा हात लावू शकत नाही का? हे सर्व लोक प्रसाद लाड, आशिष शेलार सर्वांविरोधात आरोप होते आणि तपास सुरु होता, असं राऊत म्हणाले आहेत.

## आम्ही बापाच्या दोन नंबरच्या पैशावर उडत नाही, आमच्या नादी लागलात तर... भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याने सदा सरवणकरांच्या मुलाला सुनावलं

**पान क्र. १ वरुन...**

समाधान सरवणकर आणि त्यांची बहीण प्रिया सरवणकर यांचे स्थानिक पातळीवर अक्षता तेंडुलकर यांच्याशी वाद आहेत. याच वादाचा आता भडका उडाला आहे. अक्षता तेंडुलकर यांनी फेसबुकवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमधून अक्षता तेंडुलकर यांनी प्रिया सरवणकर आणि समाधान सरवणकर यांच्यावर जळजळीत भाषेत टीका केली आहे. हिंदुत्व आणि मोदींजींसाठी आम्ही काम करतो. बापाच्या दोन नंबरच्या पैश्यावर आणि पदावर आम्ही नाही उडत, आणि युतीधर्म फक्त भाजप पाळणार, अशा गैरसमजात अजिबात राहू नका. आमच्या नादी लागलात तर आरे ला कारे करायला आम्हाला चांगलंच जमतं, असे अक्षता तेंडुलकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर माहीममध्ये भाजप विरुद्ध शिवसेनेतील वाद चव्हाट्यावर आला आहे. यावर आता सदा सरवणकर काय प्रतिक्रिया देतात, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. माहीमधील या वादाचा फटका आता दक्षिण मध्य मुंबईतील शिंदे गटाचे उमेदवार राहुल शेवाळे यांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे गटाच्या नेत्यांकडून हा वाद लवकरात लवकर मिटवण्याचे प्रयत्न होतील. समाधान सरवणकर यापूर्वी २०२२ मध्ये गणेशोत्सवाच्या काळात ठाकरे गटाशी झालेल्या वादामुळे चर्चेत आले होते. त्यावेळी दादर परिसरात अनंतचतुर्दशीच्या दिवशी मिरवणुकांच्या स्वागतासाठी मंच उभारण्यात आला होता. या मंचाच्या शेजारी ठाकरे गटाकडूनही एक मंच उभारण्यात आला होता. त्यावेळी समाधान सरवणकर यांनी 'म्याव म्याव' असा आवाज काढत ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना डिवचले होते. त्यामुळे दोन्ही गटात तुफान राडा झाला होता. काही दिवसांनी हा वाद पुन्हा उफाळून आला होता. हे प्रकरण पोलिसांत गेले. त्यावेळी सदा सरवणकर यांनी त्यांच्याकडील पिस्तुलातून पोलिसांदेखत गोळीबार केला होता. हे प्रकरण तेव्हा चांगलेच गाजले होते.

## महायुती, मविआत 'या' जागांचा तिढा सुटेना, प्रचारासाठी वेळ मिळेल ना?

**पान क्र. १ वरुन...**

साहजिकच प्रचाराचा कालावधी कमी होतोय. त्यामुळे महाराष्ट्रात शेवटच्या टप्प्यातील इच्छुकांची डोकेदुखी वाढलीय.. महायुतीत या जागांवरील तिढा कायम - मुंबई उत्तर पश्चिम मुंबई उत्तर मध्य मुंबई दक्षिण ठाणे पालघर कल्याण नाशिक मविआचा उमेदवार ठरेना मुंबई उत्तर मध्य मुंबई उत्तर पाचव्या टप्प्यातील या सर्व मतदारसंघात १८ मेपर्यंत प्रचार करता येणार आहे. ३ मेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार. आयत्यावेळी उमेदवारी जाहीर झाल्यास प्रत्यक्ष प्रचाराला २० ते २२ दिवसच मिळू शकतात. एका लोकसभा मतदारसंघात ६ विधानसभा मतदारसंघ पकडले तरी प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी जास्तीत जास्त ३-४ दिवस मिळतील. त्यामुळे इच्छुकांचं टेन्शन वाढलंय. इतक्या कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचणार कसं.. याचं टेन्शन इच्छुकांना आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघाचा तिढा काही सुटताना दिसत नाहीए. राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळांनी नाशिकमधून माघार घेतली. मात्र आता भाजपकडून इच्छुक उमेदवारांनी नाशिक लोकसभेची ही जागा भाजपसाठी मागितलीय.. त्यासाठी भाजपचे इच्छुक उमेदवार दिनकर पाटील यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना थेट पत्र पाठवलं आहे. महायुती आणि महाविकास आघाडीला बंडखोरीचाही सामना करावा लागतोय. सांगलीतून अपक्ष म्हणून लढण्याचा निर्धार काँग्रेस बंडखोर विशाल पाटलांनी केलाय. विशाल पाटलांचं बंड शमवण्यात काँग्रेस नेत्यांनी सपशेल अपयश आलं. त्यामुळं आता सांगलीत ठाकरेंची मशाल विरुद्ध बंडखोर विशाल असा थेट सामना रंगणाराय. शिवसेना ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या विरोधात विशाल पाटील शड्डू ठोकून आखाड्यात उतरलेत. विशाल पाटलांचं बंड थोपवण्याची जबाबदारी बाळासाहेब थोरातांना देण्यात आली होती. विशाल पाटलांना विधानपरिषदेवर पाठवण्याचा प्रस्ताव महाविकास आघाडीकडून देण्यात आला. मात्र त्यांनी ही ऑफर धुडकावून लावली आणि बंडाचा झेंडा कायम ठेवला. त्यामुळं आता त्यांच्यावर काँग्रेसकडून निलंबनाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

## जूनपर्यंत बदलणार कोस्टल रोडचा चेहरामोहरा; नवे बदल तुम्हाला कितपत फायद्याचे?

**पान क्र. १ वरुन...**

साधारण १२ वाजेपर्यंत इथून जाणाऱ्या वाहनांचा आकडा मोठा असतो. यानंतर दुपारी तीन ते चार या वेळेतही वाहनांची संख्या जास्त असते. सध्या कोस्टल रोडवर वरळीतील बिंदू माधव ठाकरे चौक, रजनी पटेल चौक आणि भुलाबाई देसाई रोडवरून प्रवेश करता येतो. तर, अमरसन्स गार्डन, भुलाबाई देसाई रोड आणि मरीन ड्राईव्ह येथून या कोस्टल रोडला Exit अर्थात बाहेर पडण्यासाठी नाट देण्यात आली आहे.


## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०७/१३४०५/४** ही मिळकत **अंकीत राजकुमार यादव** यांच्या नावे आहे. ही मिळकत **दिपक भग्गू चौहान** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ठिकाण- गोखिवरे**

**दि. - २४/०४/२०२४**

**दिपक भग्गू चौहान**

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०१/१३६२८/२१** ही मिळकत **राधा दिलीप सुर्यवंशी** यांच्या नावे आहे. ही मिळकत **दिलीप तुकाराम सुर्यवंशी** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ठिकाण- गोखिवरे**

**दि. - २४/०४/२०२४**

**दिलीप तुकाराम सुर्यवंशी**

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०७/१३४५०/५** ही मिळकत **राजकुमार मोतीलाल यादव** यांच्या नावे आहे. ही मिळकत **कपिल लल्लन अहमद** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**ठिकाण- गोखिवरे**

**दि. - २४/०४/२०२४**

**कपिल लल्लन अहमद**


## शालेय शिक्षण विभागाच्या खात्यातून ४७ लाख ६० हजार चोरीला

**पान क्र. १ वरुन...**

या आधी पर्यटन विभागाच्या खात्यातूनही अशाच प्रकारे ६७ लाख चोरीला गेले होते. शासनाच्या खात्यातून अशा प्रकारे लाखो रुपये चोरीला जात असल्याने अनेकांच्य भूवया उंचावल्या आहे. ही गंभीर बाब आहे. हे पहिली वेळ नसून दुसरी वेळ आहे. महिन्याभरातील ही दुसरी घटना आहे. गेल्या महिन्यतच पर्यटन विभागाच्य खात्यातून ६७ लाख चोरीला गेले होते. याचा तपास मरीन लाईन पोलिस करत आहे. एका महिन्यात दुसऱ्यांदा घटना घडत असून निवडणुकीच्या धामधुमीत शासनाचे विभागाकडे लक्ष आहे की नाही असाच सवाल या निमित्ताने उपस्थित आहे. मंत्रालयात जी बँक आहे तिथून ही रक्कम चोरीला गेली आहे. ज्या आरोपीच्या खात्यातून ही रक्कम चोरीला गेली आहे ही सर्व खाती कोलकाता येथील आहे. महिन्याभरातील ही दुसरी घटना असून आता तरी शासन काय करणार आहे का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. एका महिन्यात दुसऱ्यांदा ही घटना घडल्याने संपूर्ण राज्याचा कारभार हाकणारी यंत्रणा सुरक्षित नसल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे. मंत्रालयात प्रवेश करताना प्रत्येकाची अगदी काटेकोरपणे तपासणी केली जाते. सीसीटीव्हीने सगळ्यांवर नजर असते तरीही हा प्रकार घडला आहे. चोरीची बाब निदर्शनास ही येताच त्याने चोरीची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांकडे गुन्हाही दाखल केला.

## मतदानास ..

**औदासिन्य कमालीचे**
**जात नाही मतदानास**
**आळस भरलाकसला**
**अशा निर्लज्ज मनास**

**एन्जॉयकरायची सुट्टी**
**बेत रंगवलेले फर्मास**
**चारमतांने फरककाय**
**वेदना ना बोचे वर्मास**

**उच्च शिक्षीत साक्षर**
**कर्तव्यांस का मागास**
**शिक्षणबनले शून्यवत**
**ग्रहण लागले खग्रास**

**येवू द्या निवडून कुणी**
**गादी घे विना सायास**
**एक वागणे ते चुकीचे**
**भवितव्य जाई लयास**

**तारतम्य नसे काहींना**
**मत देतात अनाभ्यास**
**शाई लागली बोटांला**
**सेल्फी प्रसिद्धी ध्यास**

**पैसा दारू भेटवस्तूंचा**
**कुणास सतावे हव्यास**
**निवडून देई सहजतेने**
**का नादान उमेदवारास**

**भयग्रस्त जे पछाडलेले**
**का बळी पडती भयास**
**असूनही मत दान गुप्त**
**बरबाद करती उभयांस**

**वापरतात नोटा पर्याय**
**असूनि उमेदवार खास**
**शभरनंबरी सांगा सोने**
**दिसेल कधी रे कुणांस**

**मारेकरी रेलोकशाहीचे**
**असे सारे भरले उदास**
**दुसरा बदलेलं सिस्टीम**
**प्रत्येकांस कसा अधास**

**मतदान रे अत्यावश्यक**
**हा लोकशाही विश्वास**
**उदासीन का सुखासीन**
**कोंडतात स्वताचाश्वास**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## वसईकरांसाठी मोठी बातमी; किल्ल्यात तळ ठोकून बसलेला बिबट्या अखेर जेरबंद

**पान क्र. १ वरुन...**

तसंच, किल्ल्यातील प्रमुख रस्ताही संध्याकाळनंतर बंद करण्यात आला होता. बिबट्याला पकडण्यासाठी वसई किल्ला परिसरात पिंजरा लावण्यात आला होता. मात्र रो-रो फेरी आणि नागरिकांची वर्दळ यामुळं बिबट्या पकडण्यास अडचणी येत होत्या. बिबट्या बाहेर पडण्याच्या वेळीसच वर्दळ असल्याने बिबट्या किल्ल्याबाहेर पडत नव्हता. त्यामुळं वनविभागाने रो-रो फेरीच्या शेवटच्या दोन फेऱ्या रद्द कराव्यात अशी मागणीही केली होती. वनविभागाच्या विनंतीनुसार, शेवटच्या दोन फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या. वनविभागाने या सगळ्या प्रयत्नांअखेर २३ एप्रिल रोजी पहाटे २च्या सुमारास वसई किल्ल्यात शिरलेल्या बिबट्याला पकडण्यात यश आले आहे. वन विभाग आणि वाईल्ड वाल्डन या सामाजिक संस्थेने संयुक्त कारवाही करून बिबट्या जेरबंद केला आहे. मागच्या २५ दिवसापासून बिबट्या ने वसई किल्ल्यात आपला तळ ठोकला होता. सुदैवाने यात कोणतीही जिवीतहानी झाली नव्हती. मात्र, किल्ला परिसरात दहशतीचे वातावरण पसरले होते. वन विभागाने पूर्ण किल्ला परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते. तसेच किल्ल्यातील भुयार यावर पाळत ठेवली होती. शेवटी एका भुयारात बिबट्या असल्याचे निष्पन्न होताच त्याठिकाणी सापळा लावून त्याला सुखरूप पकडण्यात यश आले आहे. वन विभागाच्या पिंजऱ्यात त्याला जेरबंद करून रात्रीच वन विभाग घेऊन गेले आहेत. आता बिबट्याची वैद्यकीय चाचणी करून तो सुखरूप असल्याची निष्पन्न होताच त्याला जंगलात सोडून देण्यात येईल. वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, तुंगारेश्वर अभयारण्यातून हा बिबट्या वसई किल्ला परिसरात आला होता. आता बिबट्या जेरबंद करण्यात आल्यानंतर वसई किल्ल्याच्या परिसरातील किल्ला बंदर, पाचूबंदर भागातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

## चिंतामुक्त असावे सदा

**मनातले दुःख आपले कधीही,**
**कोणालाही न सांगता हृदयातच जपलेले असते**
**आणखी एक खासियत अशी,**
**विचारांच्या ओघात आपण ते पचवलेलेही असते... १**

**सारे काही सुरळीत असताना,**
**आयुष्यात एखादी झुळूक अचानक दुःखाची येते**
**नेमकी त्यावेळी आपल्या मनात,**
**जपलेल्या दुःखी क्षणांची आठवण अस्वस्थ करते... २**

**अक्षरशा रडावेसे वाटते त्या क्षणी,**
**थकलेल्या नयनात अश्रूची भेट मात्र होतच नसते**
**अश्रू संपले की दुःख समजेना होते,**
**त्यावेळी मनाला ही संभ्रमावस्था सतावतच असते... ३**

**दुःख पहिल्यासारखे राहिले नाही,**
**सवय झालीय का असे मनाला असे प्रश्न पडतात**
**दुःखाने व्याकुळलेला जीव तुमचा,**
**विचारे कशाला तुम्ही नजर शून्यात लावून बसतात...४**

**अशावेळी स्वतःच्या कर्माला टोकून,**
**माणूस मग नशिबाला निष्कारणच दोष देत बसतो**
**सहानभूती जी कामाला येत नाही,**
**स्वतःचे थोडे चिंतन व फक्त थोडा वेळ हवा असतो...५**

**आवडलेले अन निवडलेले अशावेळी,**
**आपल्या नशिबी नेमकी दुर्दैवाने यांची ताटातूट होते**
**म्हणूनच आनंदाने थाटलेल्या प्रपंचात,**
**सतत ठतडजोडठ करताना जीवन चिंतामुक्त जे रहाते...६**

**प्रदीप वि. मस्तकार**
**मोबाईल - ९१३७०५७९७८**

# नवी मुंबई पोलिसांच्या सोबत होपमिरर फाउंडेशनने फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट संदर्भात जनजागृती शिबिराचे केले आयोजन

**नवी मुंबई (प्रतिनिधी),** होपमिरर फाउंडेशन ही एक समर्पित गैर-सरकारी संस्था आहे जी समुदायांना सक्षम बनवण्यासाठी आणि सकारात्मक बदलांना चालना देण्यासाठी वचनबद्ध आहे. फाउंडेशनचे उद्दिष्ट सामाजिक, पर्यावरणीय आणि मानवतावादी चिंतांचे निराकरण करणे आहे. फाउंडेशन गरजू मुलांना शिक्षणासह अनेक मागासलेले लोकाना आधार देण्याचे कार्य करते आणि चांगल्या सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक पाऊल टाकण्यासाठी कार्यशील असते. संस्थेचे संस्थापक, रमझान शेख, समाजाच्या सुधारणेसाठी सतत कार्य करण्यावर विश्वास ठेवतात. तांत्रिक बाबींच्या क्षेत्रात दैनंदिन प्रगती होत असल्याने गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. ऑनलाइन फसवणुकीशी संबंधित पूर्वीचे गुन्हे, जसे की नोकरीच्या गरजांसाठी खोटी आश्वासने देणे आणि पैशांची उधळपट्टी करणे, बेकायदेशीर रिअल इस्टेट-संबंधित क्रियाकलाप किंवा कोणत्याही प्रकारची ऑनलाइन आर्थिक फसवणूक, दिवाणी गुन्ह्याखाली नोंदवले जायचे. गुन्हे शाखेने आता आर्थिक गुप्तचर युनिट (FIU) या नवीन विभागाची स्थापना केली आहे, जो केवळ अशा




गुन्ह्यांशी संबंधित क्रियाकलाप हाताळतो. लोकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांना परिस्थितीचे महत्त्व अधिक समजावे यासाठी नवी मुंबई पोलीसने होपमिरर फाऊंडेशन सोबत या विषयावर जनजागृती करण्यासाठी विविध भागात आणि समाजांमध्ये जनजागृती शिबिरे आयोजित करून काम करत आहे. स्थानिक लोकांमध्ये फाऊंडेशनने खारघर सेक्टर ३४, नवी मुंबई येथे पहिले जनजागृती शिबिर घेतले, जे यशस्वीरित्या पार पडले. या जनजागृती मोहिमेसाठी पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र वंजारी यांनी समाज जागृतीसाठी मोलाचे प्रयत्न केले. क्राइम ब्रँचचे हे युनिट लोकांच्या जीवनावर चांगला परिणाम करेल कारण त्यांना आता ऑनलाइन फसवणुकीशी लढण्यासाठी एक भक्कम पर्याय आहे. तसेच, लोकांमध्ये जागरूकता वाढवण्याच्या दिशेने पावले उचलल्याबद्दल मी FIU, गुन्हे शाखा नवी मुंबईच्या सर्व अधिकाऱ्यांचा आभारी आहे, असे होपमिरर फाऊंडेशनचे संस्थापक रमझान शेख म्हणाले.

## ठाणे विधानसभा मतदारसंघात नियुक्त विविध पथकांनी दक्ष रहावे - सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील

**ठाणे,** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या अंतर्गत असलेल्या १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या विविध पथकांच्या कामकाजाचा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उर्मिला पाटील यांनी आढावा घेऊन सर्व पथकांना दक्षतेच्या सूचना केल्या. यावेळी अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार डॉ. आसावरी संसारे उपस्थित होत्या. यावेळी १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या आचारसंहिता विषयक नऊ भरारी पथके,नऊ स्थिर सर्वेक्षण पथके, चार व्हिडिओ सर्वेक्षण पथके, दोन व्हिडिओ पाहणी पथकांमधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजाचा सखोल आढावा यावेळी घेण्यात आला. या मतदारसंघात माजिवडा नाका, बाळकुम नाका व साकेत नाका या तीन ठिकाणी कार्यान्वित होणाऱ्या स्थिर सर्वेक्षण पथकांनही दक्षतेच्या सूचना देण्यात आल्या. आचारसंहिता विषयक पथके, एक खिडकी पथक व लेखा विषयक यांनी समन्वय साधून कशा प्रकारे काम केले पाहिजे, स्थिर सर्वेक्षण पथकाने कशा प्रकारे काम करावे याचेही सूक्ष्म मार्गदर्शन करण्यात आल. तसेच मतदारसंघातर्गत सहा पोलिस ठाणे यांच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना यांनादेखील कायदा व सुव्यवस्था बाबत जागरूक राहण्याच्या सूचना दिल्या. आचारसंहितेचे योग्य रीतीने पालन व्हावे, राजकीय पक्षांचे प्रतिनिधींना विहित मुदतीत एक खिडकी द्वारे तत्काळ परवाने मिळावेत यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश श्रीमती पाटील यांनी यावेळी दिल्या. स्ट्रॉंग रुम सुरक्षे बाबत योग्य ती दक्षता घेण्याविषयीही त्यांनी संबंधितांना निर्देश दिले. त्याचप्रमाणे उपस्थित राजकीय पक्षाचे प्रतिनिधींना देखील निवडणूक विषयक सुरू असलेल्या कामकाजाची माहिती देण्यात आली. विविध परवानग्या तत्काळ मिळण्यासाठी आवश्यक कार्यपद्धती सविस्तर सांगण्यात आली . त्याच प्रमाणे २६ एप्रिल २०२४ रोजी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करताना पालन करावयाच्या नियमाविषयी देखील विस्तृत चर्चा करण्यात आली.

# मान्सूनपूर्व नालेसफाईचा आढावा घेण्याकरिता मा. आयुक्त यांचा शहरात पाहणी दौरा



**भाईंदर (प्रतिनिधी),** दिनांक २३ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी मान्सून पूर्व नालेसफाईचा आढावा घेण्याकरिता १५ नंबर बस स्टॉप, जेपी इन्फ्रा, सिल्व्हर सरिता, रेल्वे समांतर येथील नाला, भाईंदर पश्चिम याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, नाविन्य कक्षातील प्रतिनिधी आणि स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते. सर्वप्रथम शहरात ज्या ठिकाणी नाल्यांचे बांधकाम झाले आहे त्यावरील झालेले अतिक्रमणवर कारवाई करण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नालेसफाई/गटारसफाई केल्यानंतर काठाशी काढून ठेवला जाणारा गाळ थोडासा सुकल्यानंतर लगेच उचलला जावा याबाबत स्वच्छता निरीक्षकांना सूचना देण्यात आल्या. रस्त्यालगत/नाल्याच्या बांधकामालगत पडलेले डेब्रिज त्वरित उचलण्याचे निर्देश बांधकाम विभागास देण्यात आले. ज्याठिकाणी कच्चे नाले खोदाई व नाल्यांचे बांधकाम सुरू आहे त्याची यादी त्वरित सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नालेसफाई सुरू असलेल्या प्रभागातील सर्व स्वच्छता निरीक्षकांनी नियमित नालेसफाईचा आढावा घेण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. यंदाच्या वर्षी नालेसफाईच्या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा चालणार नसून नालेसफाईची कामे ही मुदतीच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी दिल्या.

# अभिनेता रणवीर सिंहची 'त्या' व्हिडीओ विरोधात एफआयआर दाखल

पान क्र. १ वरुन...

पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे. रणवीर सिंहच्या प्रवक्त्याकडून याबाबत एक अधिकृत निवेदन जारी करण्यात आले आहे. या निवेदनानुसार, अभिनेता रणवीर सिंहने डीपफेक व्हिडीओ प्रमोट करणाऱ्या सोशल मीडिया अकाउंटविरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. अभिनेता रणवीर सिंह हा नुकताच क्रिती सेनन आणि मनीष मल्होत्रासोबत एका फॅशन शोमध्ये सहभागी होण्यासाठी वाराणसीला पोहोचला होता. दरम्यान, एक व्हिडिओ समोर आला. या व्हिडीओत रणवीर एका राजकीय पक्षाच्या बाजूने बोलताना दिसत आहे. मात्र, या व्हिडीओच्या आवाजात छेडछाड केले असल्याचे दिसून येते. या व्हिडिओमध्ये AI च्या माध्यमातून व्हॉईस क्लोनच्या मदतीने त्याचे शब्द बदलण्यात आले असल्याचे म्हटले जात आहे. बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट अभिनेता आमिर खानने देखील पोलिसात तक्रार केली आहे. सोशल मीडियावर आमिर खानचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.या व्हिडीओत आमिर खान एका विशिष्ट राजकीय पक्षाचा प्रचार करताना दिसत आहे. त्या पक्षाला मतदान करण्याचे आवाहन आमिर खान करत असल्याचे दिसत आहे. आपण कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा दिला नसल्याचे आमिर खानने सांगितले.

# सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणी मुंबई पोलिसांना मिळाले मोठं यश

पान क्र. १ वरुन...

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या ठिकाणी पिस्तुल फेकण्यात आले, त्या ठिकाणी आरोपी विक्की गुप्ता याला नेण्यात आले होते. त्यानंतर शस्त्र शोधण्यास सुरुवात झाली. गोळीबार प्रकरणातील आरोपींविरोधात मुंबई पोलीस आणखी कलमे जोडण्याची शक्यता आहे. १४ एप्रिल रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकीस्वारांनी अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केला होता. या घटनेनंतर मोठी खळबळ उडाली. मुंबई पोलिसांनी तातडीने या प्रकरणाचा तपास सुरू केला. या घटनेची जबाबदारी तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिष्णोई याचा भाऊ अनमोल बिष्णोई याने घेतली. घटनास्थळापासून काही अंतरावर पोलिसांना गुन्ह्यात वापरलेली दुचाकी सापडली होती. सीसीटीव्ही फूटेजमध्ये पोलिसांना आरोपींचे चेहरे दिसले. या घटनेच्या ७२ तासांच्या आत मुंबई पोलिसांनी गुजरातमधून आरोपींच्या मुसक्या आवळल्या. गोळीबाराचा लॉरेन बिश्नोई गँगशी संबंध आहे. याआधी देखील बिश्नोई गँगकडून सलमानला धमक्या देण्यात आल्या होत्या. लॉरेन्स बिश्नोई ज्या बिश्नोई समाजातून येतो, हा समाज निसर्ग पूजक असून त्या समाजात काळविटांना देवासमान मानले जाते. १९९८ मध्ये चित्रपटाच्या चित्रीकरणा दरम्यान सलमान खानने दोन काळवीटांची शिकार केल्याचा आरोप आहे. त्यामुळेच लॉरेन्सकडून सलमान खान धमकी देण्यात आली होती. त्यानंतर आता, घराजवळ गोळीबार झाला.

# ५२९ कोटींच्या आलिशान घरात घेणार अनंत - राधिका सप्तपदी, जेम्स बाँड व ब्रिटनच्या राणीचं कनेक्शन

पान क्र. १ वरुन...

हा ब्रिटनमधील सर्वात जुना कंट्री क्लब असून इथे जेम्स बाँडचे शूटिंग झालं होतं. तर अबू धाबी मध्ये लग्नाचा संगीत सोहळा होणार आहे. नीता अंबानी स्वतः आपल्या धाकट्या मुलाचं लग्न संस्मरणीय बनवण्याच्या जोरदार तयारीत लागली आहे. घ्इथ्चं वेळापत्रक सांभाळात त्या लग्नाची तयारी करत आहेत. विवाह सोहळयासाठी ड्रेस कोड असून या लग्नाची पत्रिकाही खास आहे. ९ पानांचे निमंत्रण पत्रिका बॉलिवूड स्टार्स आणि पाहुण्यांच्या घरी पोहोचवली जाते आहे. कारण या फंक्शनच्या वेळापत्रकानुसार बॉलिवूड स्टार्स आणि दिग्गज आपले वेळापत्रक ठरवतील. अंबानी कुटुंबाच्या लग्न समारंभातील पाहुण्यांच्या यादीत शाहरुख खान, सलमान खान, बच्चन फॅमिली, रणवीर, दिपका, विराट कोहली, कतरिना कैफसह अनेक बड्या स्टार्सची नावं असल्याचा मीडिया रिपोर्टमध्ये सांगण्यात आलंय.

# मुंबईकरांना सावध करणारी बातमी; भाजी विक्रेती म्हणून घरोघरी फिरणारी महिला निघाली अट्टल गुन्हेगार

त पान क्र. १ वरुन...

यापद्धतीने त्यांनी अधिक तपास करण्यास सुरुवात केली. तेव्हा निलोफर खान पोलिसांच्या रेकॉर्डवर आली. पोलिसांनी तिच्यावर पाळत ठेवल्यावर गुन्हा उघडकीस आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलोफर खानने आत्तापर्यंत ३ लाख रुपये किंमतीच्या वस्तु चोरल्या आहेत. त्यात रोख रक्कम आणि दागिनेदेखील आहेत. खान हिच्या नावावर यापूर्वीही गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. दीड ते दोन वर्षांपूर्वी कुरार पोलिसांनी निलोफरला घरफोडी प्रकरणात अटक केली होती. तिच्या अटकेनंतर तिने पठाणवाडी येथील तिचे घर भाड्याने दिले आणि जवळच्याच परिसरात भाड्याने राहू लागली. तिचा पती सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करतो तर मुलगा ड्रायव्हर म्हणून कामाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलोफर चोरी केलेले दागिने विकत असे आणि त्या पैशांतून ती फ्रीज, टिव्ही, वॉशिंग मशिनसारख्या वस्तु खरेदी करत असे. संतोष नगर येथून आरोपी महिलेने रोख रक्कम आणि दागिने असे मिळून १,१२,००० हजार रुपयांचा ऐवज चोरला होता. तर, अप्पर गोविंद नगर येथे तिने जवळपास १,७८,००० रुपयांचा ऐवज चोरी केला होता. चोरीची तक्रार मिळाल्यानंतर, एपीआय डॉ चंद्रकांत घार्गे आणि त्यांच्या पथकाने स्मिता पाटील, डीसीपी आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक इरफान पठाण, दिंडोशी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला. पोलिसांनी सीसीटिव्ही फुटेज पडताळून पाहिले, यावेळी त्यांना खान संशयास्पद अवस्थेत परिसरात वावरत असल्याचे दिसून आले. बंद घराचे कुलूप तोडण्यात पटाईत असल्याचेही पुढे चौकशीत आढळून आले. सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य पुरावे समोर आल्यानंतर पोलिसांनी थेट कारवाई केली. पोलिसांनी निलोफरला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तिला गुन्ह्यांबाबत विचारले असता तिने पहिले काहीही सांगण्यास नकार दिला. नंतर पोलिसा खाक्या दाखवताच तिने आत्तापर्यंत केलेल्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे, असे अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

# मी बजावणार मतदानाचा हक्क! म्हणत पोतराज करत आहे मतदान जनजागृती

**ठाणे,** मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासन, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक कार्यालय व १४८ ठाणे विधानसभा निवडणूक कार्यालयाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आता या उपक्रमामध्ये पोतराजही सहभागी झाला असून आपल्या कलेद्वारे नागरिकांमध्ये मतदान करण्याचे आवाहन करत आहे. लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ठाणे शहरात २५ ठाणे-लोकसभा मतदार संघाअंतर्गत १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्यात येत आहे. प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे. कोणताच घटक मतदानापासून वंचित नाही राहिला पाहिजे या संकल्पनेअंतर्गत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. ठाणे शहरात मतदान जनजागृती कार्यक्रम सुरू असताना अचानकपणे तेथे पोतराजचे आगमन झाले. त्यांनी मतदान जनजागृतीचे फलक पाहिले, घोषणा ऐकल्या. पोतराजाने स्वतःहून स्वीप पथकास म्हणला, की आपण सर्व हे लोकशाही बळकट करण्यासाठी व मतदान टक्का वाढण्यासाठी कार्यक्रम करत आहात. मी पण एक पोतराज आहे आणि पोतराज हा देवीची उपासना करणारा लोकसंस्कृतीचा उपासक असतो. पोटासाठी मी आसूड घेऊन नाचतो, पण मी आपल्या देशासाठी मतदान करणार, मतदान माझा



अधिकार आहे.यावेळी पोतराज यांनी त्यांच्या गाण्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्व सांगितले. पोटाचे खळगे भरण्यासाठी तो पोतराज स्वतःच्या अंगावर आसुडाचे फटके ओढत होता आणि एकीकडे मतदान माझा अधिकार आहे, असे म्हणत तो गाण्यातून सर्वांना मतदान करण्याचे आवाहन करत होता. हा मतदान जनजागृती कार्यक्रम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आसावरी संसारे यांच्या प्रेरणेने आणि स्वीप पथक प्रमुख सोपान भाईक यांच्या नेतृत्वाखाली पार पडत आहे.

# मानखुर्दमध्ये सहा वर्षांच्या चिमुकल्याचा खड्ड्यात पडून मृत्यू

पान क्र. १ वरुन...

एका सहा वर्षाच्या चिमुरड्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.आयुष राजेश शेगोकार असे या दुर्देवी मृत्यू पावलेल्या चिमुरड्याचे नाव आहे.आज सकाळी तो त्याच्या घरापासून जवळ मानखुर्द रेल्वे स्थानक लगत असलेल्या आणि पाण्यानी भरलेल्या खड्ड्याजवळ मित्रांसह खेळायला गेला होता.अचानक तो खड्डात पडला आणि बुडाला.या वेळी मानखुर्द रेल्वे स्थानकात उभ्या प्रवाश्यांनी हे दृश्य बघितले आणि त्या खड्ड्याकडे धाव घेतली. गर्दी झाल्यानंतर लोहमार्ग पोलिस देखील तिथे दाखल झाले.त्यांनी तत्काळ खड्ड्यात बुडालेल्या आयुषला बाहेर काढले आणि पालिकेच्या शताब्दी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहे. मात्र या घटनेला प्रशासन जबाबदार असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. सध्या मुलांच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू आहे. अनेकजण नोकरी, व्यवसाय सांभाळत असल्याने अनेकदा लहान मुलांकडे दुर्लक्ष होते. या माध्यमातून अशा घटना उघडकीस येत आहेत. त्यामुळे लहान मुले खेळण्याच्या बहाण्याने कोणत्याही वस्तूला पटकन हातात घेत असतात, कधी एखादी धारदार वस्तू हातात घेऊन खेळत असतात. तर कधी रस्त्यावर, बाहेर जाऊन खेळात असतात. अशावेळी अनुचित प्रकार घडण्याची संभावना असते. अशा घटना वारंवार घडत असल्याने पालकांनी वेळीच या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे दिसते.

# उल्हासनगर महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत जागतिक वसुंधरा दिन साजरा

**उल्हासनगर (प्रतिनिधी) :** पृथ्वीवरील भुमी, जल, वायु अग्नि व आकाश या पाच घटकांमध्ये आधुनिकीकरणामुळे व विकास कामांमुळे होणारे प्रदुषण थांबविण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक असल्याने उल्हासनगर महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त, अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक वसुंधरा दिन साजरा करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेमधील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यात आली. पृथ्वीवरील मानवी जीवनासाठी सर्वात प्रदुषणकारी घटक हा प्लास्टीक असुन एकल प्लास्टीकचा वापर करु नये , असे वारंवार सांगितले जात आहे. परंतु त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. त्यामुळे आता प्लास्टीकच्या वस्तुंना नकार देणे हाच एकमेव उपाय असुन आपणाद्वारे प्लास्टीकच्या वस्तुंना नकार दिल्यास अशा उत्पादनांना आळा बसु शकतो. प्लास्टीकच्या वस्तुंच्या वापरातून अनेक आजार उदा. कॅन्सर, ॲनेमिया, ओबेसिटी, श्वसनाचे आजार असे आजार होत आहेत. अशाप्रकारे पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी प्लास्टीकचा वापर करू नये या संबंधी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. ठजागतिक वसुंधरा दिनठ निमित्त विद्यार्थ्यांसमवेत हरीत शपथ घेऊन दैनंदिन जीवनात प्लास्टीकच्या वस्तूंचा वापर करणार नाही याबाबत आश्वस्त केले. तसेच उपस्थितांमध्ये कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेच्या व्यवस्थापक सुनिता वत्तुरकर यांचे विशेष सहकार्य लाभले. सदर ठिकाणी पर्यावरण विभागाचे लिपीक श्री. सयाजी घाटविसावे, दिपक तांबे व भुषण गोरे हे देखील उपस्थित होते.

# मतदार जनजागृती अभियानास बचत गटातील महिलांचा उदंड प्रतिसाद

**ठाणे,** लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी ठाणे शहरात २५ ठाणे-लोकसभा मतदार संघाअंतर्गत १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयामार्फत स्वीप कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्यात येत आहे. निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीच्या या उत्सवात ठाणे शहरातील जास्तीत जास्त मतदारांनी सहभाग घ्यावा, यासाठी मतदार जनजागृती करण्यात येत असून चिखलवाडी, भास्कर कॉलनी येथे मतदान जनजागृतीसाठी श्री स्वामी समर्थ व हिरकणी महिला बचतगटांच्या सदस्यांची एकत्रित बैठक घेऊन आवाहन करण्यात आले. महिला बचत गटांच्या माध्यमातून मतदार जनजागृती उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला. बचतगटातील महिलांना मतदानाचे महत्व समजावे आणि त्यांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावे यासाठी 'मतदान अमूल्य दान' या संकल्पनेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या परिसरातील महिलांना 'मी मतदान करणार, आपल्या देशाचे भवितव्य घडविणार' अशी सामूहिक शपथ देण्यात आली. बचतगटांच्या माध्यमातून लोकसभा




निवडणुकीत मतदानाची टक्केवारी, कशी वाढवता येईल या विषयावर चर्चासत्र आयोजित करून मतदान जनजागृती करण्यात आली. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकांनी कोणत्याही आमिषांना बळी न पडता मतदानाचा अधिकार बजावावा. लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच आपल्या कुटुंबातील सदस्यांना, नातेवाईकांना व राहत असलेल्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे आणि सर्वांनी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवाहनही बचत गटातील महिला सदस्यांना करण्यात आले. या मतदान जनजागृती कार्यक्रम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आसावरी संसारे यांच्या नेतृत्वाखाली स्वीप पथक प्रमुख सोपान भाईक यांच्यासह टीम उपक्रम यशस्वीपणे राबवित आहेत.

परशुराम समाचार
नियमीत वाचणे ही
एक चांगली सवय

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०१/१०१८८/४** ही मिळकत **अमित तुकाराम खरपुरे** यांच्या नावे आहे. ही मिळकत **अंजु शिवकुमार मौर्या, शिवकुमार मौर्या** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

**ठिकाण- गोखिवरे**
**दि. - २४/०४/२०२४**
**अंजु शिवकुमार मौर्या, शिवकुमार मौर्या**

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०३/१३८८०/२०** ही मिळकत **संतोष भारती स्वामी** यांच्या नावे आहे. ही मिळकत **मेसाराम दिपाराम देवासी** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

**ठिकाण- गोखिवरे**
**दि. - २४/०४/२०२४**
**मेसाराम दिपाराम देवासी**

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०४/२६४७/३१** ही मिळकत **भरत बी. भट्ट** यांच्या नावे आहे. ही मिळकत **सुभाषचंद्र बिहारीलाल गौतम, मनिषा** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

**ठिकाण- गोखिवरे**
**दि. - २४/०४/२०२४**
**सुभाषचंद्र बिहारीलाल गौतम, मनिषा**

## मालमत्ता हस्तांतरण नोटीस

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती जी वालीव हद्दीतील गोखिवरे विभाग येथील **मालमत्ता-क्र. जी.के.०४/२६४७/५१** ही मिळकत **दिलीप कुमार एम.आर.** यांच्या नावे आहे. ही मिळकत **राघवेंद्र प्रसाद यादव, सुमन यादव** यांच्या नावे कायम स्वरुपात हस्तांतरित करण्यात येत आहे. या मिळकती बाबत कुणाची हरकत/हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून सात (७) दिवसांचा आत वसई विरार शहर महानगरपालिका, क्षेत्रीय गोखिवरे विभाग कार्यालयात लेखी पुराव्यास कळवावे. अन्यथा संबंधिताचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

**ठिकाण- गोखिवरे**
**दि. - २४/०४/२०२४**
**राघवेंद्र प्रसाद यादव, सुमन यादव**




# मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक संपन्न

**भाईंदर (प्रतिनिधी),** दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सून पूर्व आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस अतिरिक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्रमांक १ ते ६, महापालिका अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलीस अधिकारी, नॅशनल हायवे प्रतिनिधी, महानगर गॅस प्रतिनिधी, जे कुमारचे प्रतिनिधी उपस्थित होते. मान्सून दरम्यान कोणत्याही आपत्कालीन घटना यावर्षी घडू नये यासाठी आधीपासूनच आवश्यक ती दक्षता घेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर द्यावा असे निर्देश देत महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी निर्देश दिले. मान्सून २०२४ पावसाळापूर्व तयारीच्या अनुषंगाने विविध प्राधिकरणांसोबत आयोजित शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीप्रसंगी समितीचे अध्यक्ष म्हणून मा. आयुक्तांनी मिरा भाईंदर शहरातील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नियोजन करावे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी असे सूचित केले. यामध्ये सध्या सुरू असलेल्या स्थापत्य विषयक कामांची स्थिती जाणून घेत ही कामे २४X७ तास सुरू ठेवून जलद गतीने व कामाची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करावीत असे निर्देशित केले. रस्ते खड्डेमुक्त राहावेत याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देतानाच कुठल्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा चालणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले. मॅनहोल कव्हर व गटारांची साफसफाई करून त्यांच्यावरील तुटलेली झाकणे ही तातडीने बदलून घेण्याचे निर्देश दिले. गटार किंवा नाल्या शेजारील रस्त्यावरील डेब्रिज उचलणे व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात बांधलेले गटारे साफ ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले. तसेच शहरातील बांधकामे सुरू असलेल्या इमारतींची माहिती व इमारतीच्या चहूबाजूंनी सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या व इतर



अपघात प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. रस्त्यावरील दिवाबत्ती सुव्यवस्थित राहील व विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. याकरिता प्रत्येक विद्युत खांबाची काळजीपूर्वक पाहणी करावी असे निर्देश देण्यात आले. वाहतुक पोलीस विभागामार्फत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पावसाळी काळात सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहील याकडे लक्ष द्यावे तसेच स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसींगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारितील रस्त्यांवर करून घ्यावीत असे सूचित करण्यात आले. सर्व पथदिवे सुरु राहतील याची खबरदारी घेण्याप्रमाणेच महावितरण कंपनीने उघड्या केबल, डिपीची झाकणे बंद असण्याची खबरदारी घ्यावी व दुरुस्ती करून घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या. तसेच एम.टी.एन.एल, एम.जी.एल ने केलेल्या खोदाई संदर्भातील माहिती घेऊन तातडीने उर्वरित कामे पूर्ण करून घेऊन रस्ते दुरुस्ती करून घ्यावी असे निर्देश दिले. बंदिस्त नाले व नैसर्गिक नाले यांची सफाई विहित वेळेत पूर्ण करावी असे घनकचरा व्यवस्थापन विभागास निर्देश देण्यात आले. तसेच सफाईनंतर काठाशी काढून ठेवला जाणारा गाळ थोडासा सुकल्यानंतर

**पावसाळीपूर्व स्थितीचा आढावा घेताना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कामे युद्धपातळीवर पूर्ण करून घेण्याचे मा. आयुक्त यांच्या सूचना**

लगेच उचलला जावा याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व तो कोणत्याही प्रकारे दूषीत होणार नाही याची काळजी घ्यावी असे सूचित करण्यात आले. तसेच आवश्यक एवढ्या ब्लिचिंग पावडरचा साठा करून ठेवणे व जल शुध्दीकरणकरीता आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मलःनिसारण जलवाहिन्या आदी दुरुस्त करून त्यांची बारकाईने पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी धोकादायक इमारतींची पाहणी करून इमारतींचे वर्गीकरण करून त्यांची यादी जाहीर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सदर यादी ही आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कृती आराखड्यामध्ये प्रसिद्ध करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. पावसाळी कालावधीतील संभाव्य आजार लक्षात घेता महानगरपालिकेकडे आवश्यक औषध साठा उपलब्ध करून ठेवणे तसेच संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि व्यापक जनजागृती करणेबाबत मा. आयुक्तांनी महत्वाच्या सूचना केल्या. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन केंद्रातील यंत्र सामुग्रीसह यंत्रणा सुसज्ज व कार्यान्वित ठेवणेबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील सर्व अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू करून या सर्व ठिकाणी आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे असे सूचित केले. रहदारीला अडथळा येणा-या झाडांच्या फांद्यांची आवश्यक तेवढ्याच प्रमाणात छाटणी करावी असे सूचित करतानाच त्याचा हरित कचरा त्वरित उचलण्यासाठी उद्यान व स्वच्छता निरीक्षकांनी परस्पर समन्वय राखावा असे निर्देश देण्यात आले. मागील वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विभाग कार्यालयांमध्ये १ जून २०२४ पासून २४X७ आपत्कालीन कक्ष स्थापन करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. दरड/घनमाती कोसळण्याची संभाव्य ठिकाणे तसेच नैसर्गिक नाल्यांची ठिकाणे येथील झोपड्या/घरे स्थलांतरीत करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना सर्व प्रभाग अधिकारी यांना देण्यात आल्या. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या निवाऱ्याकरीता आवश्यक शाळांमध्ये प्रभाग अधिकाऱ्यांनी पूर्वनियोजन करावे. तसेच महापालिका विभाग कार्यालयात आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे असे मा. आयुक्तांनी सूचित केले. याशिवाय विभाग कार्यालयात असलेल्या रबर बोटी, पाणी उपसा पंप तसेच इतर साहित्य व उपकरणे कार्यान्वित असल्याबाबत तपासणी करून घ्यावी असेही निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी दिले.

# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीची २४ एप्रिल रोजी बैठक

**ठाणे,** महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ आणि ठाणे जिल्हा समन्वय समिती यांच्या वतीने ठाणे जिल्ह्यातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांची बुधवारी, दि.२४ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात ही बैठक होणार असून जिल्ह्यातील सर्व वर्ग एक व वर्ग दोनच्या राजपत्रित अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ ही संघटना अधिक सबळ आणि कार्यशील करण्याच्या दृष्टीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीसाठी संस्थापक अध्यक्ष व मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, कोषाध्यक्ष नितीन काळे या मान्यवरांसह राज्य कार्यकारीणीचे इतर पदाधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.या बैठकीस जिल्ह्यातील सर्व विभागाच्या राजपत्रित वर्ग- अ आणि ब अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, कार्याध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, उपाध्यक्ष मोहन पवार व सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.

# इखाच्या उन्हात सुखाचा फुलोरा..

**हा** चैताचा महिना म्हणजे जांभळीला फुलोरा येण्याचा काळ. हा फुलोरा कुणालाही मोहून घेऊ शकतो. पण, त्या सुंदर फुलांकडं आपण कधी फारसं लक्षही दिलेलं नसतं.

**शिवारमाथा उभा जागता, रखरखणारे ऊन रान खळयाचे गोल चोपडे, खोल मेढीची खूण।। जिकडेतिकडे पाऊलवाटा, गाई म्हशींची खुरं मंदमंदल्या पाऊल चाली, झळ वाहे चौखुर।। भेगाळून खपल्या झालेला, कातळ खीळ फुटताना कडक उन्हाने धडक पेटला, खडकही धीट उताना।।**

चैत्र हा उन्हाचा महिना समजला जातो. वैशाखात आणखी रखरख वाढते हे खरं, पण चैत्रात उन्हाचा तडाखा सोसवणार नाही, असा असतो. कारण वैशाखापर्यंत ऊन सोसण्याची सवय होऊन जाते. त्यामुळं ती रखरख सहन तरी होते. चैत्रात मात्र एकदमच अंगावर येणारं ऊन असह्य होऊन जातं. हिवाळयात गारव्याची सवय झालेल्या जिवाला उन्हाची तलखी सहन होईनाशी होते. पण, गाव-खेड्यातल्या माणसांना घरात बसून तर राहता येत नाही. शेतात कामाची धामधूम सुरू असते. ज्वारी काढणं सुरू असतं. ते संपलं असेल, तर रानाची मशागत करून ठेवणं सुरू असतं. या उन्हात जमीन उलथीपालथी केली की तापते अन् मग पुढच्या वर्षी ती अधिक पिकते. त्यामुळं जमीन उलथण्याचं अवघड काम याच काळात करायचं असतं. त्यासाठी लोखंडी नांगर जुंपावे लागतात. हे मोठं कष्टाचं आणि तेही भर उन्हात करावं लागतं. अलीकडं ट्रॅक्टर आल्यामुळं ते थोडं सुसह्य झालं आहे. अशावेळी नवीन लग्न झालेल्या तरुणालाही या कामाच्या रामरगाड्यातून सुटका नसते. उलट आपल्या अंगातली रग त्यानं मातीशी झोंबून उपयोगाला आणावी, असं घरातल्या लोकांना वाटत असतं. पण, त्याचवेळी जिच्याशी त्याचं नुकतंच लग्न झालंय, तिला मात्र आपल्या जोडीदाराची काळजी वाटत असते. तिला वाटत असतं की, काम करायला हरकत नाही. त्या शिवाय पोट कसं भरणार? पण, उन्हापासून संरक्षणही करायला हवं. त्यासाठी काय काय करायला हवं, ते ती सूचकपणे जात्यावरच्या गाण्यात गुंफत असते...

**विशेष लेख**

उन्हाळयाचं ऊन, चईताची पायपोळ माझं सुकलं जाईफळ। उन्हाळयाचं ऊन, लागतं चईताचं तोंड कोमेजलं ताईताचं। उन्हाळयाचं ऊन, लागतं दुपारून सेला देऊ का उपरणं? उन्हात काम करताना आपल्या नवऱ्याचा सुकलेला चेहरा तिला सुकलेल्या जायफळासारखा वाटतो. गळयातला ताईत असलेला आपला नवरा चैताच्या उन्हात सुकून गेलेला आहे म्हणून, असं करू नका, सोबत उपरणं असू द्या, असं ती त्याला म्हणते. नुकतंच लग्न झालेलं असतं. त्या लग्नातला शेलाही अशावेळी उपयोगाला येतो. म्हणून ती विचारते, शेला देऊ का उपरणं? आपल्या नवऱ्याची दुपारची भाकरी घेऊन ती शेतात जाते, तेव्हा तिच्या लक्षात येतं की, ज्या शेतात आपला नवरा काम करतोय, तिथं झाडझुडूप नाही. मग सावली कुठून येईल? अशा वेळी ती निसर्गालाच प्रार्थना करते अन् म्हणते... उन्हाळयाचं ऊन, माझ्या सख्याला सोसंना कुठं सावली दिसंना। उन्हाळयाचं ऊन, दगडाच्या झाल्या लाह्या शेला पांघरावा राया। उन्हाळयाचं ऊन, देवा शिराळ पडूदेना माझा सुखवाशी गेला रानोवना।। ज्याच्या सहवासात मी सुखी असते, तो माझा सुखवाशी, माझा मालक हे निसर्गा तुझ्यासोबत या कठोर उन्हात रानावनात आला आहे. त्याच्या शेतात झाडझुडूप नाही, तेव्हा तूच त्याच्यावर शिराळ पाडना रे, अशी विनवणी ती निसर्गाला करते. कारण तिथं कुठंच तिला सावली दिसत नाही. म्हणून तिचा जीव तळमळतो. ती सावलीत असली, तरी आपल्या उन्हातल्या मालकावर ऊन आहे या जाणिवेनं ती त्या सावलीतही पोळत असते. म्हणून निसर्गाला आपल्या सुखवाशी माणसाच्या अंगावर शिराळ म्हणजे ढगाची सावली पाड, असं ती सांगते. तिथं शेतात झाडझुडुप नसलं, तरी पलीकडं नदीकाठी मात्र जांभळाचं बन असतं. दुपारी औत सुटल्यावर तो बैलांना पाणी



पाजण्यासाठी तिकडं जाणारच असतो. त्या निमित्तानं दुपारचं ऊन त्याला टाळता येणार असतं. या उन्हाळयाच्या दिवसातही तिथल्या जांभळाला हिरवागार पाला असतो. त्या गडद चमकदार हिरव्या पानांच्या सावलीत जीव सुखावतो. म्हणून तो तिलाही तिथं घेऊन जात असतो. हा चैताचा महिना म्हणजे जांभळीला फुलोरा येण्याचा काळ. हा फुलोरा इतका सुंदर असतो की, तो कुणालाही मोहून घेऊ शकतो. त्या सुंदर फुलांकडं आपण कधी फारसं लक्षही दिलेलं नसतं. पण, त्या फुलोऱ्याचा आकार कुठल्या कलाकाराला प्रयत्न करूनही साधणं दुर्मिळ असतं. त्यामुळं जांभळीच्या फुलाचं चित्र कुणी काढल्याचं, त्याचं कौतुक केल्याचं आपल्या पाहण्यात वा ऐकिवात नसतं. हिरव्यागार पानांवर हा पांढऱ्या फुलोऱ्याचा तवर जांभळीला झाकून टाकत असतो. मोहोळाच्या माशाही त्या फुलोऱ्याभोवती रुंजी घालत असतात. अशावेळी त्या जांभळीच्या झाडाखाली तिच्यासोबत दुपारचं ऊन टाळणं याच्यासारखं दुसरं सुख त्याच्या आयुष्यात नसतं. जवळपास माणसं नसतात. जनावरं चारा खाऊन, पाणी पिऊन, डोळे मिटून रवंथ करीत बसलेली असतात. त्यांचंही लक्ष कुणाकडं नसतं. वर जांभळीच्या झाडावर असलेली पाखरं उन्हाच्या कहारानं गडद जांभळीच्या पाल्यात स्वतःला झाकून घेण्याच्या प्रयत्नात असतात. तेव्हा इतरांकडं लक्ष द्यायला त्यांनाही वेळ नसतो. अशावेळी या चैताच्या उन्हात रानावनात कोणी माणसंही फिरताना दिसत नाहीत. कामाशिवाय कुणी घराबाहेर पडतच नाही. त्यामुळं जणू काही या नवविवाहित जोडप्यासाठीच हा एकांत अन् ही रम्य जागा निसर्गानं निर्माण केली असावी. जांभळाचा फुलोरा दाखवण्याच्या निमित्तानं तो तिलाही फुलवत असतो. **- इंद्रजित भालेराव**

# १०० टक्के मतदान करण्याचा ठाणे शहरातील चर्चच्या सदस्यांचा निर्धार

**ठाणे,** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ठाणे जिल्ह्यात पाचव्या टप्प्यात २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. ठाणे जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी १४८ ठाणे मतदारसंघ निवडणूक कार्यालयाच्या वतीने स्वीप कार्यक्रमाअंतर्गत मतदान जनजागृती मोहिम सुरू आहे. याअंतर्गत रविवारी ठाण्यातील अवर लेडी ऑफ मर्सी चर्च व लेडी फातिमा चर्चमध्ये जमलेल्या नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच चर्चच्या फादरनी सुद्धा चर्चच्या सदस्यांना मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले.१४८ ठाणे मतदार संघ निवडणूक कार्यालयाच्यातर्फे आयोजित मतदार जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत ठाण्यातील विविध ठिकाणी मतदारांना आवाहन करण्यात येत आहे. याअंतर्गत काल माजीवाडा येथील अवर लेडी फातिमा चर्च तसेच पोखरण रोड येथील अवर लेडी ऑफ मर्सी चर्चमध्ये जमलेल्या सुमारे पाच हजाराहून अधिक नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन स्विपच्या टीमने तसेच चर्चच्या फादरनी केले. पोखरण रोड क्रमांक दोन येथील अवर लेडी ऑफ मर्सी चर्चचे फादर जॉन आल्मेडा यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे पाच हजार सदस्यांनी निवडणूकीत मतदान करण्याची शपथ चर्चमध्ये घेतली. तसेच येत्या काही दिवसांत चर्चचे सदस्य मतदान वाढविण्यासाठी जनजागृती करणार आहेत. माजिवडा परिसरातील अवर लेडी ऑफ फातिमा चर्च येथे व चर्चच्या आवारात प्रार्थनेसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली होती. या नागरिकांनी मतदान जनजागृतीचा कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. यामध्ये युवावर्ग, स्त्रिया, पुरुष, दिव्यांग नागरिक आणि ज्येष्ठ नागरिक यांचा समावेश होता. या सर्वांना स्विप टिमच्या वतीने मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. अवर लेडी ऑफ फातिमा चर्चमध्ये मतदान करा असे आम्हाला सांगण्यासाठी स्वतः प्रशासन आले आहे. मतदान जनजागृती ही खूप महत्वाची आहे. आमच्या समाजातील काही सदस्य परदेशात राहत असल्याने आणि येथे राहणारे बरेच लोक मतदानासाठी येत नसल्यामुळे मतदान टक्केवारी कमी आहे. यावर्षी सर्व सदस्यांनी मतदान करावे, यासाठी विशेष प्रयत्न करणार असून आम्ही पूर्ण



उत्साहाने मतदान करणार आहोत आणि आमच्या सर्व बांधवाना मतदान करण्यास प्रवृत्त करणार आहोत, असे चर्चच्या फादर यांनी यावेळी सांगितले. १४८ ठाणे मतदार संघ निवडणूक कार्यालयाच्यातर्फे ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात विविध ठिकाणी जनजागृतीविषयक कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील, स्वीप पथक प्रमुख सोपान भाईक यांच्यासह यांच्यासह स्विपचे सदस्य यासाठी विशेष मेहनत घेत आहेत.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदान टक्के वाढीसाठी Sveep अंतर्गत मतदान जनजागृती करणे बाबत

**भाईंदर (प्रतिनिधी),**२५ ठाणे लोकसभा मतदार संघामधील १४६ ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार २५



ठाणे लोकसभा मतदार संघातील १४६ ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.२०/०४/२०२४ रोजी मंगल मार्केट, घोडबंदर व काजुपाडा मराठी शाळा क्र०३, काशिमरी परीसर येथे सकाळी १०.०० ते १२.३० वाजे पर्यंत स्वीप अंतर्गत जनजागृती करण्यात आली. १४६ ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप पथकातील कर्मचारी यांनी मंगल मार्केट, घोडबंदर व काजुपाडा मराठी शाळा क्र०३, काशिमरी परीसर येथे फेरीवाले, भाजीवाले, दुकानदार, माथाडी कामगार व नागरीकांना मतदार नोंदणी व मतदान जनजागृती संदर्भात माहीती देवुन दि. २०/०५/२०२४ सोमवार या दिवशी आपल्या कुटुंबियांस (आई, वडील, भाऊ, बहीण, मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान केले व मतदान नोंदणी संदर्भात माहीती दिली. सदर कार्यक्रमास १४६ ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप पथकातील कर्मचारी वर्ग, फेरीवाले, भाजीवाले, दुकानदार, माथाडी कामगार व नागरीक उपस्थीत होते. सर्वांनी मतदार नोंदणी करुन दि.२०/०५/२०२४ रोजी सर्वांनी मतदान करावे तसेच मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या १४६ ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप पथकाने उपस्थीत फेरीवाले, भाजीवाले, दुकानदार, माथाडी कामगार व नागरीकांचे आभार मानले.

# उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत माझी वसुंधरा अभियान ८.० अंतर्गत दिनांक २२ एप्रिल, २०२४ हा दिवस जागतिक वसुंधरा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

**उल्हासनगर (प्रतिनिधी),** पृथ्वीवरील भुमी, जल, वायु अग्नि व आकाश या पाच घटकांमध्ये आधुनिकीकरणामुळे व विकास कामांमुळे होणारे प्रदुषण थांबविण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त, अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक वसुंधरा दिन निमित्त महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेमधील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यात आली. पृथ्वीवरोल मानवी जीवनासाठी सर्वात प्रदुषणकारी घटक हा प्लास्टीक असुन एकल प्लास्टीकचा वापर करु नये असे वारंवार सांगितले जात आहे. परंतु त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. त्यामुळे आता प्लास्टीकच्या वस्तुंना नकार देणे हाच एकमेव उपाय असुन आपणाद्वारे प्लास्टीकच्या वस्तुंना नकार दिल्यास अशा उत्पादनांना आळा बसु शकतो. प्लास्टीकच्या वस्तुंच्या वापरातून अनेक आजार उदा. कॅन्सर, ॲनेमिया, ओबेसिटी, श्वसनाचे आजार असे आजार होत आहेत. अशाप्रकारे पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी प्लास्टीकचा वापर करू नये यासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. जागतिक वसुंधरा दिन निमित्त विद्यार्थ्यांसमवेत हरीत शपथ घेऊन दैनंदिन जीवनात प्लास्टीकच्या वस्तूंचा वापर करणार नाही याबाबत आश्वस्त केले. तसेच




उपस्थितांमध्ये कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेच्या व्यवस्थापक सो. सुनिता वत्तुरकर यांचे विशेष सहकार्य लाभले. सदर ठिकाणी पर्यावरण विभागाचे लिपीक श्री. सयाजो घाटविसावे, दिपक तांबे व भुषण गोरे हेदेखील उपस्थित होते.

Printed and Published by DILIP SIDDHESHWAR SINGH and Printed at **The New Millennium Printers :** 14 A ground floor, Sitaram Mill Patra Shed, Sitaram Mill compound. Jacob Circle, Lower Parel Mumbai - 400013 MAHARASHTRA and Published at A/05, CHANDRESH RECIDENCY., LODHA COMPLEX, MIRA ROAD EAST, DIST- THANE - 401107, MAHARASHTRA editor DILIP SIDDHESHWAR SINGH

RNI No MAHMAR/2010/37490, Postal No. PLG/243/2022-2024 Posted at Mira Road Post Office, From Daily, Date of Publication- Daily